**“महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा व ऊर्जा साठवणूक धोरण २०२५-२६ ते २०३५-३६” नुसार “सिंगल विंडो पोर्टल” (Single Window Portal) मध्ये सुधारणा सुचविण्याच्या दृष्टीने समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अपाऊ-२०२६/प्र.क्र.१०४/ऊर्जा-७.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०४ जुन, २०२६.

<u>वाचा</u>:- शासन निर्णय क्रमांक अपाऊ-२०२५/प्र.क्र.२२/ऊर्जा-७, दिनांक १८.०३.२०२६

<u>**प्रस्तावना:-**</u>

महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण-२०२५-२६ ते २०३५-३६” दिनांक १८.०३.२०२६ रोजी जाहिर करण्यात आले आहे. अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प विकासकांना विविध विभागीय मंजुऱ्या व आवश्यक परवानग्या व नोंदणीकरण कालबद्ध पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात, तसेच विभागांमधील समन्वय अधिक प्रभावी व्हावा यासाठी सिंगल विंडो पोर्टल तयार करण्यात आले आहे. नवीन अपारंपारिक ऊर्जा धोरणाची यशस्वी आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी, उद्दिष्टित ध्येय गाठण्यासाठी, सद्यस्थितीत अस्तिवात असलेल्या “सिंगल विंडो पोर्टल” मध्ये सुधारणा करणे अपेक्षित आहे. सदर धोरणानुसार “सिंगल विंडो पोर्टल” मध्ये सुधारणा सुचविण्याच्या दृष्टीने समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय:-**</u>

“महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा व ऊर्जा साठवणूक धोरण २०२५-२६ ते २०३५-३६” च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सदर धोरणाचा अभ्यास करून त्याअनुषंगाने “सिंगल विंडो पोर्टल” मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) **समितीची संरचना:-**

| अ.क्र. | नाव/पदनाम | अध्यक्ष/सदस्य |
|---|---|---|
| १. | महासंचालक, महाऊर्जा | अध्यक्ष |
| २. | कार्यकारी संचालक, (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण | सदस्य |
| ३. | मुख्य अभियंता, राज्य भार प्रेषण केंद्र (SLDC) | सदस्य |
| ४. | मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम (STU) | सदस्य |
| ५. | मुख्य अभियंता (नवीन व नवीकरणीय ऊर्जा), महावितरण | सदस्य |
| ६. | मुख्य अभियंता (वाणिज्य), महावितरण | सदस्य |
| ७. | महाव्यवस्थापक (सौर), महाऊर्जा | सदस्य |
| ८. | महाव्यवस्थापक (पवन), महाऊर्जा | सदस्य सचिव |

**ब) समितीची कार्यकक्षा:-** समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे.

१) “सिंगल विंडो पोर्टल” चा आढावा घेवून सद्यस्थितीत अस्तिवात असलेल्या प्रणालीमध्ये महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा व ऊर्जा साठवणूक धोरण २०२५-२६ ते २०३५-३६ नुसार पूढील दोन वर्षात करावयाच्या सुधारणा सूचविणे.

२) सदर समिती दोन महिन्यांच्या मुदतीत धोरणातील तरतूदीनुसार तात्काळ करावयाच्या सुधारणांचा प्रस्ताव शासनास सादर करेल.

**क) समितीच्या बैठका:**

सदरची समिती दरमहा बैठक आयोजित करेल आणि ऊर्जा विभागाला त्याबाबतचा मासिक प्रगती अहवाल सादर करेल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०६०४१५१८३३२४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAYANT SHARAD SAGADE

Digitally signed by JAYANT SHARAD SAGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=A6FD5F8313A5DBBC809E855BE10E149644DDC66D66F20F36D4D55BCFB56CEB55, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CAF6324C416282449C4078681A5B8972EB1D149920D77CC78A41448DF59C4C9, cn=JAYANT SHARAD SAGADE
Date: 2026.06.04 15:19:32 +05'30'

**( जयंत सागडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक व औफाफ), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (अपारंपारिक ऊर्जा), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (ऊर्जा), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा.मंत्री व सर्व मा.राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मा.विधानमंडळ सदस्य, विधान भवन, मुंबई,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव, (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
११. सर्व सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
१३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
१४. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे,
१५. मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, चेंबूर,
१६. सह सचिव (ऊर्जा-७), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. कार्यकारी संचालक, राज्य भार प्रेषण केंद्र, एरोली,
१८. कार्यकारी संचालक, (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण,
१९. मुख्य अभियंता, राज्य भार प्रेषण केंद्र, (SLDC),
२०. मुख्य अभियंता, राज्य पारेषण उपक्रम (STU),
२१. मुख्य अभियंता (नवीन व नवीकरणीय ऊर्जा), महावितरण,
२२. मुख्य अभियंता (वाणिज्य), महावितरण,
२३. महाव्यवस्थापक (सौर), महाऊर्जा,
२४. महाव्यवस्थापक (पवन), महाऊर्जा,
२५. निवड नस्ती, ऊर्जा-७, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.